# Review of Research

International Online Multidisciplinary Journal

Volume - 11 | Issue - 1 | October - 2021

Impact Factor : 5.7631(UIF) ISSN: 2249-894X


# मराठी कादंबरीतील भाविणीचे जीवन




PRINCIPAL
Shivaraj College of Arts,Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)


प्रा. डॉ. मनमोहन विश्वनाथ राजे


प्रा. डॉ. मनमोहन विश्वनाथ राजे

कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



स्त्री आणि पुरुष हे दोन महत्वाचे घटक मानले जातात. त्यांच्यामुळेच असे असले तरी पुरुषाला जेवढे महत्वाचे स्थान



Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
Save Tree, Save Paper, Save World
ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol - 11 | Issue - 1 | October - 2021

## Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | **A COMPARATIVE STUDY ON SKILL RELATED PHYSICAL FITNESS BETWEEN RESIDENTIAL AND NON-RESIDENTIAL SCHOOL BOYS**<br>Dr. Mahantesh Khanapur & Dr. Siddalingappa C. Sajjanar | 1 |
| 2 | **EXERCISE AND BODY COMPOSITION**<br>Dr. Biswajit Bhunia | 6 |
| 3 | **HISTORY AND OTHER SOCIAL SCIENCES**<br>Dr. Bhagirati B. K. | 11 |
| 4 | **COVID- 19 AND LIBRARIES: CHALLENGES, OPPORTUNITIES**<br>Dr. Sachin D. Sakarkar | 14 |
| 5 | शिक्षा मनोविज्ञान का महत्व<br>डॉ. गोपाल पाल | 18 |
| 6 | "उद्यमिता विकास में बैंकों की भूमिका"<br>डॉ.कन्हैया कुमार विश्वकर्मा , डॉ. राजू रैदास | 23 |
| 7 | **FEDERALISM:THE COMPARATIVE AND THE SHIFTING DIMENSIONS OF INDIA AND U.S.A.**<br>Dr. Vaishali Jadhav | 30 |
| 8 | **IMPLEMENTATION OF INCLUSIVE EDUCATION: CHALLENGES AND OPPORTUNITIES**<br>Km. Rama Soni and Prof. Nandlal Mishra | 45 |
| 9 | "आर्थिक विकास में व्यावसायिक बैंकों के योगदान का अध्ययन"<br>डॉ.राजू रैदास , डॉ.एकता तिवारी | 51 |
| 10 | शाही मुगल महिलाओं की फ़ारसी शायरी एवं शैक्षिक योग्यता का एक परिचय<br>राकेश विज एवं डॉ. बहारुल अली | 57 |
| 11 | मराठी कादंबरीतील भाविणीचे जीवन<br>प्रा. डॉ. मनमोहन विश्वनाथ राजे | 63 |

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 1 | OCTOBER - 2021

# मराठी कादंबरीतील भाविणीचे जीवन

प्रा. डॉ. मनमोहन विश्वनाथ राजे
शिवराज आर्टस्, कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## १. प्रस्तावनाः–



मानवी जीवनामध्ये स्त्री आणि पुरूष हे दोन महत्वाचे घटक मानले जातात. त्यांच्यामुळेच मानवजात वृद्धिंगत झालेली आहे. असे असले तरी पुरूषाला जेवढे महत्वाचे स्थान दिले, त्या प्रमाणात स्त्रीला दिले नसल्याचे दिसून येते. पुरूषप्रधान संस्कृतीमुळेच स्त्रीवर अनेक प्रकारे बंधने लादलेली आहेत. समानतेच्या पातळीवर स्त्री अद्यापि आलेली नसल्याचे दिसते. प्राचीन काळापासून स्त्रीला अशाप्रकारे दुय्यम स्वरूपाची वागणूक दिलेली आहे. शिक्षण घेण्यासाठी तिला अधिकार नव्हता. मात्र जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले हया समाजसुधारक दांपत्यामुळे स्त्री शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे तिचा हळूहळू विकास होऊ लागला. मात्र अज्ञान, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, दारिद्रय आदी गोष्टींमुळे स्त्रीवर अन्याय अत्याचार होत राहिला. देव आणि धर्माचा तिच्यावर प्रभाव असल्यामुळे अनेक अनिष्ट चालीरीतींमध्ये ती गुंतली गेली. साहजिकच धार्मिक जीवनामध्येही तिच्यावर अत्याचार होत राहिले. स्त्रीची जाणीवजागृती नसल्यामुळेच स्त्री अन्यायाच्या गर्तेमध्ये अडकल्याचे जाणवते.

## २. देवदासी संकल्पना, व्याप्ती आणि स्वरूप :

स्त्रीचा दासी म्हणून उल्लेख केला जातो. "दासी म्हणजे सेविका, चाकरी करणारी स्त्री बटीक गुलाम स्त्रीदास होय"[१] दासीसंदर्भात असे म्हटलेले आहे. धर्मशास्त्रामध्ये दासी म्हणजे स्त्री अथवा गुलाम असा अर्थ नसून रतिसुखासाठी विकत घेतलेली स्त्री असा आहे. प्राचीन कालामध्ये 'दासी' म्हणून स्त्रीचा सेवा करण्यासाठी उपयोग होत होता. वस्तूप्रमाणे स्त्रीला विकत घेणे, देणे असा व्यवहार होत असे. वैदिक संस्कृतीमध्ये दासींना दान म्हणूनही दिले जात असे. 'मनुस्मृती' ग्रंथामध्ये दासीचे उल्लेख आलेले आहेत. धार्मिक नियमांनी स्त्रीला मनुस्मृतीने बंदिस्त केले. 'स्त्री कधीच स्वतंत्र होऊ शकत नाही. तिने नेहमी पुरूषाच्या अधीन रहावे' असे मनू सांगतो.

"पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति"[२]

स्त्रीला अशाप्रकारे गुलामगिरीचा शृंखलांनी मनूने जखडून टाकल्यामुळे स्त्रीवर त्याचे दुरुगामी परिणाम झाले. मनूच्या स्त्रीस्वातंत्र्याच्या मुद्याबद्दल अनेक मतभेद आहेत. नरहर कुरुंदकर त्याबद्दल म्हणतात, "मनुस्मृतीतील स्त्रीनिंदा फक्त मानवजातीत असणारा कामवासेचा प्रवाह थोपवावा आणि माणूस

नीतीमान करावा यासाठी आहे, असे समर्थन करणारी मंडळी अतिशय बेजबाबदारपणे अर्ध्या मानवजातीच्या गुलामगिरीचे समर्थन करतात.''[३]

भारतीय संस्कृतीमध्ये देवधर्माला अधिक स्थान असल्यामुळे त्याचा प्रभाव स्त्रीवर अधिक असल्याचे दिसते. स्त्री देवधर्माची भक्ती करु लागली. साहजिकच ती त्यामध्ये अधिक प्रमाणात गुंतली. स्त्री जशी पुरुषाची सेवा करते, त्याला जसा कामभोग देते, त्याच पद्धतीने देवधर्माच्या बाबतीत अवलंब केला. स्त्री पुरूषाची दासी होता होता, देवाची दासी झाली. म्हणजेच स्त्री पुरूषाची दासी होता होता, देवाची दासी झाली. म्हणजेच स्त्री देवदासी झाली. देवदासी, ब्रह्मदासी, स्वतंत्र दासी, शूद्र दासी असे दासीचे चार प्रकार सांगितले आहेत. पैकी ''देवदासी म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. अपत्य प्राप्तीकरिता किंवा अपत्य जगण्याकरिता पालक पहिले मूल देवाला वाहण्याचा नवस करतात, त्यालाच देवदासी म्हटलेले आहे.''[४] समाज निम्नवर्ग देवभोळा, अशिक्षित आणि अज्ञानी असतो. देव संकटप्रसंगी आपल्याला मदत करतो अशी त्याची धारणा असते. त्याची ती भाबडी भावना असते. देवाला ते नवस बोलतात प्रत्यक्षामध्ये त्याचा कोणताही प्रत्यय येत नसला, तरी दैवी दडपणामुळे आणि भावनेपोटी आपली मुलं देवाला वाहतात. पहिली मुलगी असली तरी ती देवाला वाहिली जाते. देवाची सेवा करता करता ती भोगदासी बनते. त्यानंतर ती वेश्या बनते. देवदासी, भोगदासी, वेश्या असा देवदासीचा प्रवास होतो.

देवदासी संकल्पनेमध्ये जोगतीण, मुरळी, भावीण इ. देवदासींचा अंतर्भाव होतो. जोगतीण यल्लम्मा देवीला वाहिलेली असते. मुरळी खंडोबा दैवताला तर भावीण ही गोमंतकामध्ये शांतादुर्गा, श्रीमंगेशी आणि इतर दैवतांना वाहिलेली असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केवळ भावीण, हया देवदासीचा विचार केला आहे

## ३. भावीण :

कोकण आणि गोमंतक हया प्रदेशामध्ये भावीण ही प्रथा आहे. 'ज्या स्त्रीने देवाच्या सेवेला वाहू घेतलेले असते तिला 'भाविण' असे म्हणतात.' शांतादुर्गा, श्रीमंगेशी इ. देवतांना भाविणीला वाहिले असते. कदंब अंमलापासून गोव्यामध्ये मंदिरे बांधण्यास सुरवात झाली होती. तेव्हापासून तेथे देवदार होत्या. गोव्यातील देवदासीचे दोन गट होते.

### अ) कलावंतिणी किंवा नायकिणी

### ब) भाविणी

''भाविणीचा दर्जा कलावंतिणीपेक्षा कमी असतो. मंदिराची झाडलोट करणे, दिवे लावणे, पूजेत भ घेणे, चवरीने वारा घालणे इ. तिला कामे करावी लागतात. पुष्कळदा तिला वेश्यव्यवसाय करावा लागत भाविणीच्या संमतीला नाईक व देवळी म्हणून ओळखतात.''[५] कलावंतीण देवासमोर नृत्य आणि गायना काम करते. तिचा दर्जा उच्च असतो.

## ३.१ भाविणीचा शेसविधी :

एखादी मुलगी देवाच्या सेवेसाठी सोडायची असेल, तर तिचा शेसविधी केला जातो. ''शेसवि ..ग्नविधीसारखाच असतो. थोडा फरक असतो. शेसविधीत मुलीचे लग्न पुरूषवेशधारी मुलीशीच लावता वररूप मुलीच्या डोक्याला पागोटे बांधून हातात नारळ व सुरा देतात. जिची शेस असते, ती मुलगी त नारळाला माळ घालते. हा विधी झाल्याखेरीज ती मुलगी देवदासी होऊ शकत नाही. हा विधी म्हण मुलीला पुरूषसंबंध करण्याची दीक्षाच समजली जाते.''[६] केव्हा केव्हा भाविणीचे कटयारीशी लग्न लाव जाते. एखाद्या देवळाच्या नंदादीपातील तेल घेऊन ते एखाद्या स्त्रीच्या माथ्यावर थापले, की ती भावि होते. असेही भाविणीच्या विधीबाबत म्हटले आहे. शेसविधी झाल्यानंतर संबंधीत स्त्री वेश्याव्यवसाय कर त्याबद्दल तिला कोणताही संकोच वाटत नाही. त्यातूनच मुलांनाही जन्म दिला जातो. त्याबद्दल काब्रा म्हणतात, ''शेस पद्धतीच्या विवाहामध्ये जास्त बोली करणाऱ्या इसमाकडून गर्भधारणा केली जाते. त्या 'हातलावणी' असे म्हणतात. प्रथम समागमाच्या दिवशी भल्या पहाटे देवदासी आपल्या दारी एक नारळा रोपटे लावतात.''[७]

### ३.२ भाविणीचा वेश्याव्यवसाय :

देवदासीच्या अनिष्ट प्रथेमध्ये अंतर्भाव असणारी भावीण वेश्याव्यवसाय करते. त्याबद्दल तिला कोणताही संकोच नसतो. आलेल्या पाहुण्याचा पाहुणचार व त्याला शरीरसुख देणे हे आपले कामच आहे, असे ती समजत असे. वेश्येचे उल्लेख पुराणग्रंथामध्ये आढळतात. देववेश्या, धार्मिक वेश्या म्हणून देवदासीकडे पाहिले जाते, ''धर्माच्या नावाखाली चाललेल्या काही अनैतिक रूढीतून वेश्यावृत्ती उत्पन्न होते. देवाच्या ठेवलेल्या मुलींना देवदासी म्हणतात. देवाची प्रतिनिधी म्हणून पुजारी या मुलीचा उपभोग घेतो. त्यामुळे त्या अपवित्र होतात. धार्मिक अंधश्रद्धेतून ही प्रथा उगम पावली. दक्षिण भारतातील काही देवालयात शेकडो देवदासी असत. त्या देवसेवेबरोबर वेश्याव्यवसाय करत.''[८] देवदासीच्या वेश्याव्यवसायासंदर्भात महादेवशास्त्री जोशींचे हे विधान महत्वाचे वाटते. अनेक पुरूष भाविणीचा उपभोग घेतात. शेसविधी झाल्यामुळे अशा कृत्याला त्या नकार देत नसत. देवदासी अपत्येही जन्माला घालत असे. देवदासींचे गरोदरपण व कुटुंबनियोजन ह्यासंदर्भात काब्राल म्हणतात, ''देवदासी मुली कुटुंबनियोजन पाळत असत. गरोबदरपणाच्या सुरूवातीलाच त्या गर्भपात करून घेत. त्यासाठी त्या आयुर्वेदिक किंवा जालीम औषधे घेत. मात्र गरोदरपणाच्या चौथ्या महिन्यानंतर त्या गर्भपात क्वचितच करून घेत असत. मुलगी जन्माला आली, तर ती जगविली जाई ,व मुलगा जन्मला तर त्याची विल्हेवाट लावण्यात येई.''[९]. भावीण वेश्याव्यवसाय करते आणि अपत्यांनाही जन्म देते. मात्र कालांतराने त्यामध्येच तिचा मृत्यू होतो.

### ४. भाविणीचे मराठी कादंबरीतील जीवन :

भाविणीचे आणि कलावंतिणीच्या जीवनाचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी केले आहे. एकूण तेरा कादंबरीकार भावीण कलावंतिणीच्या जीवनाचा वेध घेऊन त्यांचे वास्तव वर्णन करतात. मामा वरेरकर (कुलदैवत), बा.भ. बोरकर (भावीण), चंद्रकांत काकोडकर (गोमंतका, जागा हो!), बा.द. सातोस्कर (जाई, मेनका), मधु मंगेश कर्णिक (देवकी), ना.सी. फडके (स्वप्नांचे सेतू), चिं.त्र्यं. खोनोलकर (त्रिशंकू), जयवंत दळवी (महानंदा), रणजित देसाई (अभोगी) इ. प्रमुख कादंबरीकारांची त्या संदर्भात नोंद घेता येते. कालानुक्रमे सर्वप्रथम मामा वरेरकरांनी १९३५ साली कलावंतिणीचे चित्रण 'कुलदैवत' नावाच्या कादंबरीमध्ये केले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये काही प्रमुख कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे. भाविणीचे दुःख, निष्ठा, तिचा अपमान, वेश्याव्यवसाय, प्रेमभावना, गायन, नर्तन, तिचे परिवर्तन इत्यादी संदर्भामध्ये भाविणीच्या व कलावंतीणीच्या जीवनाचा विचार केलेला आहे.

### ४.१ भाविणीची निष्ठा :

भाविणीची प्रथा अनिष्ट स्वरूपाची आहे. प्रथेमध्ये गुंतलेल्या स्त्रीवर अन्याय अत्याचार होत असतो. अशा स्त्रिया विवाह करून विवाहित स्त्रीप्रमाणे राहू शकत नाहीत. मात्र एखाद्या पुरूषाची जेव्हा त्यांचे संबंध येतात, तेव्हा त्याच्यावर निष्ठा ठेवतात. मामा वेरेरकरांनी (कुलदैवत) मोगा कलावंतिणीच्या माध्यमातून देवदासीचा प्रश्न मांडला असून, तिची निष्ठा त्यांनी सांगितली आहे. गोव्यातील एका खानदानी पुरूषाची मोगाची 'हातलावणी' होते. ती त्यांच्याशी एकनिष्ठ राहते. जेव्हा त्यांच्या व्यापारात तोटा होऊन, ते उद्ध्वस्त होतात, मोगा तेव्हा त्यांच्याशी एकरूप होऊन संकटात मदत करते. ती म्हणते, ''त्यांच्या नशिबी दारिद्रय आलं होतं, पण त्यावेळी मी त्यांच्याच कृपेने श्रीमंत होते. त्यांनी दारिद्रयात रहावं आणि मी मात्र वैभव भोगावं, याची मला लाज वाटू लागली. मी माझ्या अंगावरचे सर्व दागिने उतरून ठेवले आणि माहेश्वरी लुगडयाऐवजी साधा सुताडा नेसू लागते.''(पृ.६७). वरेरकर कलावंतिणीच्या निष्ठा सांगतात. शेवंतीची केशववर निष्ठा असल्यामुळे महारवाडयात जाऊन प्रौढाशिक्षणाचे वर्ग चालविते. त्याचे चित्रण बा. भ. बोरकरांनी केले आहे (भाविण). तर मोहिनी ही भाविणीची मुलगी असूनही (गोमंतका, जागा हो!) गोवा मुक्तिलढयामध्ये काम करणाऱ्या सुबोधवरील निष्ठेमुळे त्याला स्वतःचे दागिने देते व स्वातंत्र्यलढयामध्ये मदत करते. गोमंतक आणि कोकणमध्ये समजाता अनिष्ट चालीरितीत राहणाऱ्या भाविणी जवळच्या व्यक्तिवर तितकीच निष्ठा व्यक्त करतात. सुशी (त्रिशंकू), महानंदा (महानंदा) हया सर्व स्त्रिया भाविणी असल्या तरी त्या सर्वसामान्यांप्रमाणे राहून निष्ठा व्यक्त करून त्या व्यक्तीच्या जीवन कार्याला मदत करतात. अनेक कादंबरीकार भाविणीच्या मनाचे मोठेपण त्यातून व्यक्त करतात.

VOLUME - 11 | ISSUE - 1 | OCTOBER - 2021

### ४.२ भाविणीची प्रेमभावना :

प्रेम किंवा जिव्हाळा हा मानवी जीवनातील अनन्य साधारण भाव आहे. भावीण त्याला अपवाद नाही. भावीण सर्वप्रथम स्त्री असून नंतर ती भावीण आहे. एकमेकावर प्रेम करणे हा गुन्हा नसतो. भाविणीचे एखाद्यावर प्रेम असणे हा स्त्रीसुलभ दृष्टिकोन आहे. अनेक कादंबरीकार भाविणीची प्रेमभावना चित्रित करतात. मोहिनी (गोमंतका, जागा हो!) ही भावीण तर आहेच, पण ती वेश्याव्यवसाय करते. मात्र पोर्तुगिज सत्तेच्या जुलूमशाहीविरूद्ध सुबोध आंदोलन पुकारतो. सामाजिक प्रबोधन करत असतो. सुबोधचे हे कार्य पाहून मोहिनी त्याच्यावर प्रेम करते. दोघांचीही उदात्त भावना चंद्रकांत काकोडकरांनी दाखविली आहे. बा.द. सातोस्करांनी 'जाई' कादंबरीतून कलावंतिणीच्या जीवनातील असफल करूण प्रेमकहाणी चित्रित केली आहे. जाईचे सुरेशसारख्या विवाहित पुरूषावर प्रेम असते. असे असले तरी सुरेशच्या पत्नीबद्दल तिच्या मनात कटुता नसते. सुरेशवर असलेल्या प्रेमापोटी ती म्हणते, ''वासंती ताईसारखी बहीण मिळाली आणि जन्मोजन्मीची तपश्चर्या तुमच्या रूपानं फळाला आली! किती मी भाग्याची! यावेळी मरण आलं, तरी सुद्धा मोठया आनंदानं मी मरेन आणि मरताना म्हणेन, देवा माझ्या सुरेशना, माझ्या बाळांना सुखी ठेव, माझं उरलं सुरलं आयुष्य त्यांना दे.''(पृ.६२). सातोस्कर जाईचे अकृत्रिम प्रेम स्पष्ट करतात. काशी भाविणीची मुलगी सुशी (त्रिशंकू) मुंबईहून गावी आलेल्या आणि एम्.ए. शिकलेल्या नान्यावर प्रेम करते. दोघांचे प्रेम म्हणजे सुशीची शोकांतिका ठरते. तो तिच्याबरोबर लग्न करण्यास तयार असतो. त्याच्यापासून तिला दिवसही गेलेले असतात. मात्र बाम्हणांनी भाविणींना फसवून फक्त मुलांना जन्माला घातले, म्हणून सुशीचा भाऊ कर्णदादा तिला औषध देऊन मारून टाकतो. असफल प्रेमाची कहाणी कादंबरीत येते.

जयवंत दळवींनी 'महानंदा' कादंबरीत भाविणीचा जळजळीत प्रश्न मांडला असून प्रेमाची असफल मांडणी केली आहे. बाबूल आणि महानंदा हयांची प्रेमकहाणी आली आहे. मामांच्या गावी सुट्टीसाठी आलेल्या बाबूलची आणि भाविणीची मुलगी महानंदाची भेट होते व तो तिच्या प्रेमात पडतो. महानंदाची पतिव्रता स्त्रीप्रमाणे संसार करण्याची इच्छा असते. देवदासीच्या प्रथेबद्दल तिचा तिरस्कार असतो. ती त्याच्याबरोबर पळून जाण्यास तयारही असते. म्हणून ती म्हणते, ''सावलीसारखी तुमच्या पावलामागनं येईन'' हा भाविणीचा प्रथेमध्येच त्यांचा मृत्यू होतो. भाविण किंवा कलावंतीण अनिष्ट प्रथेची दखल अनेक कादंबरीकारांनी घेतली आहे. मामासाहेब वरेरकरांनी सर्वप्रथम कादंबरीतून भाविणीचे वास्तव जीवन मांडले. त्यानंतरच्या काळामध्ये काही लेखक भावीण आणि कलावंतीणींचे चित्रण करतात. त्यामध्ये कोठेही कल्पकता नाही तर वास्तव जीवन कादंबरीकारांनी मांडलेले आहे. भावीण प्रथेमध्ये वावरताना पुरूषावर निष्ठा दाखवितात. परंपरेप्रमाणे त्यांना वेश्याव्यवसाय करावा लागतो. त्यामध्ये त्यांना कोणताही संकोच नसतो. काही भाविणींचे अन्य पुरूषाशी प्रेमसंबंध निर्माण होतात मात्र ते असफल प्रेम आढळते. त्यातून काही भाविणींचा बळी जातो. काही भाविणींना अनिष्ट प्रथा नको असते. त्यांचे परिवर्तन झाले आहे. त्या विवाहित जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. काही कलावंतीणी नृत्य गायन करून देवाची उपासना व नावलौकीक मिळवून चांगले जीवन जगतात.

### ६. संदर्भ ग्रंथ :


१. दाते–कर्वे, 'महाराष्ट्र शब्दकोश', खंड ४, वरदा बुक्स, पुणे, १९३५, पृ. १९४८.
२. मनू, 'श्री सार्थ मनुस्मृती', जोशी रामचंद्र शास्त्री (संपा.), श्री गुरूदेव प्रकाशन, पुणे, १९७९, पृ २१७.
३. कुरूंदकर नरहर, 'मनुस्मृती', सारडा शंकर (संपा.) इंद्रायणी साहित्य, पुणे, १९९२, पृ. ७७.
४. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश', खंड ७, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७७, पृ ९१०.
५. तत्रैव, पृ. ९१०.
६. जोशी महादेवशास्त्री (संपा.), 'भारतीय संस्कृतीकोश', खंड ४, भारतीय संस्कृतीकोश मंडळ प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. ४४७.
७. काब्राल इसा मारीयू, 'गोमंतकातील देवदासी : चिखलातून हिऱ्याच्या खाणीकडे', पैंगीणकर अजि (संपा.), 'गोमंतक मराठी समाज हीरक महोत्सव गौरवग्रंथ विशेषांक', १९८६, पृ. नाही.

८. जोशी महादेवशास्त्री, उनि., पृ. ३५३.
९. काब्राल इसा मारीयू, उनि. पृ. नाही.
१०. कुलकर्णी मदन, 'देवदासी : यल्लमाच्या जोगतिणी', विजय प्रकाशन, नागपूर, १९९४, पृ. १५१.
११. बोरकर बा.भ., प्रस्तावना, 'भाविण', प्रिया प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १९८६, पृ. ५.